# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com   दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४   email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./ **५२६** /२०२४   दि. १८/०२/२०२४

## परिपत्रक

**विषय :- दि. २०/०२/२०२४ रोजी व्हिडीयो कॉन्फरन्सिगद्वारे आयोजित थेट प्रक्षेपणाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याबाबत.**

विद्यापीठाच्या आस्थापनेवर कार्यरत सर्व सांविधानिक अधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी व पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनी, विद्यापीठाचे विविध प्राधीकरणांचे सन्माननीय सदस्य, विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेचे सन्माननीय सदस्य तसेच गडचिरोली व चंद्रपूर क्षेत्रातील मा. खासदार, मा. आमदार, लोक प्रतिनिधी, शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पत्रकार यांना याद्वारे कळवून आमंत्रित करण्यात येते की, **राज्यातील विद्यापीठे तसेच महाविद्यालयांना समानता, प्रवेश आणि उत्कृष्ठतेची उद्दीष्टे** साध्य करण्यास मदत करण्यासाठी उच्च शिक्षण मंत्रालयाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) या योजनेला मंजूरी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने उपरोक्त योजनेची सुरुवात करण्याकरीता दि. २०/०२/२०२४ रोजी शिक्षा मंत्रालय, उच्चतर शिक्षा विभाग, भारत सरकार यांनी **व्हिडीयो कॉन्फरन्सिगद्वारे कार्यक्रमाचे आयोजन केले असून सदर कार्यक्रमाला मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्रजी मोदी हे सदर दिवशी सकाळी ११:३० आभासी पध्दतीने (थेट) मार्गदर्शन करणार आहेत.** तत्पुर्वी **सकाळी ११:०० वाजता मा. कुलगुरु महोदय संबोधित करणार आहेत. मा. धर्मेंद्र प्रधान, शिक्षा मंत्री, भारत सरकार यांनी आमंत्रित केल्यानुसार सदर कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे मा. उपमुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडणवीस हे आभासी पध्दतीने उपस्थित राहून संबोधित करण्याची शक्यता आहे.**

त्याअनुषंगाने विद्यापीठातील **सर्व सांविधानिक अधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी व पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी, गडचिरोली जिल्ह्यातील विविध प्राधीकरणांचे सन्माननीय सदस्य, विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेचे सन्माननीय सदस्य** तसेच, **मा. खासदार, मा. आमदार, मा. लोक प्रतिनिधी, पत्रकार यांचेसाठी सुमानंद सभागृह, आरमोरी रोड, गडचिरोली येथे** तसेच **चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यापीठाचे विविध प्राधीकरणांचे सन्माननीय सदस्य, मा. खासदार, मा. आमदार मा. लोकप्रतिनिधी, शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पत्रकार यांचेसाठी सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण बघण्याची व्यवस्था केलेली आहे. ऑनलाईन कार्यक्रमाची लिंक** https://pmindiawebcast.gov.in **ही आहे.**

करीता वरील सर्व संबंधितांनी **दि. २०/०२/२०२४ रोजी सकाळी ११.००** वाजता उक्त आयोजीत कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण बघण्याकरीता कृपया नियोजित ठिकाणी व नियोजित वेळी उपस्थित राहावे.

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. गडचिरोली व चंद्रपूर क्षेत्रातील मा. खासदार /मा. आमदार यांनी कृपया उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित राहावे.
४. विद्यापीठाचे विविध प्राधीकरणांचे सन्माननीय सदस्य यांनी कृपया उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित राहावे.
५. मा. प्राचार्य, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
६. इतर सर्व संबंधित सन्माननिय -------------------------------------------------------
७. सर्व प्रशासकिय/शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू परीपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
८. श्री. अमोल खोडवे, सिस्टम ॲनालिस्ट, संगणक विभाग यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
९. अधिक्षक, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर परिपत्रक पी.जी.टी.डी. च्या विद्यार्थ्यांना निदर्शनास आणून द्यावे.
१०.श्री. सचिन सेलोकर, वरिष्ठ विजतंत्री / श्री. अफझलबेग मिर्झा, कनिष्ठ विजतंत्री यांनी उपरोक्त कार्यक्रमाच्या अनुषंगाने विद्युत व्यवस्था, साऊंड सिस्टम व इतर तत्सम बाबींची व्यवस्था सांभाळावी.
११. जनसंपर्क अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
१२.आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.